सहकार न्यायालयातील १८५ अस्थायी पदांना दि.०१/०१/२०१८ ते दि.२८/०२/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. राजस २०१७/प्र.क्र.३४/५ स,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दि. १५ जानेवारी, २०१८

वाचा :-१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग क्र.राजस-१००८/ प्र.क्र.५३८/ ५-स, दि.५/५/२०११

२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग क्र.राजस २०१६/प्र.क्र.७२/ ५ स दि. १३/१०/२०१६

३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे पत्र क्र.आस्थापना/कक्ष-१/ सह.न्याय/अस्थायीपदे/मुदतवाढ/११२/२०१७,दि.३१/०१/१७ व क्र.८१५, दि.२८/०७/१७ व पत्र क्र.१४१८, दि.०४/१२/२०१७

४) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई यांचे पत्र जा.क्र.मरासअन्या/ आस्था/ अपमुवा/१३/१७, दि.१०/१/२०१७ व क्र.१९६६/२०१७, दि.२२/११/२०१७.

५) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.पदनि२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.१०/२/२०१७ व दि.०३/१०/२०१७ व दि.०८/०१/२०१८

६) समक्रमांकाचा शासन निर्णय दि.१८/०२/२०१७ व दि.१०/१०/२०१७

शासन निर्णय :-

सहकार न्यायालयातील १८५ अस्थायी पदांना दिनांक ३१/१२/२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास संदर्भादिन क्र ०६ येथील दि.१०/१०/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सहकार न्यायालयातील कामकाजाचे स्वरुप पहाता तसेच वेळोवेळी येणारे दावे यांची संख्या पहाता सदरची अस्थायी पदे पुढे चालू ठेवणे आवश्यक असून त्यांना सन २०१७-१८ करिता दि.०१/०१/२०१८ ते २८/०२/२०१८ पर्यंत मुदतवाढ मिळणेसाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी प्रस्ताव सादर केला आहे.

या विभागाच्या क्षेत्रिय आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतिबंधास उच्चस्तर सचिव समितीने दि.२१.१.२०११ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता दिली आहे. त्यानुसार सुधारीत आकृतिबंधाचा शासन निर्णय दि.५.५.२०११ रोजी निर्गमित करण्यात आला असून सुधारीत आकृतिबंधामध्ये उक्त अस्थायी पदांचा समावेश आहे. वित्त विभागाच्या दि.१/९/२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आकृतीबंधाचा दर तीन वर्षानी आढावा घेणे आवश्यक आहे. त्यानुसार शासन निर्णय दि.५/५/२०११ नुसार निर्गमित केलेल्या आकृतीबंधास दि.५/५/२०१४ रोजी तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव सहकार आयुक्त यांच्याकडून शासनास प्राप्त झाला असुन, तो मा.मुख्यसचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तर समितीच्या मान्यतेस्तव वित्त विभागास सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय दि.०८/०१/२०१८ नुसार, सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु त्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दि.०१.०१.२०१८ ते दि.२८.०२.२०१८ या कालावधीत मुदतवाढ देण्याचे अधिकार देण्यात येत

आहेत. दरम्यानच्या काळात सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी दक्षता घ्यावी अशी बाबही शासन निर्णयात नमुद केली आहे.

सबब, शासन निर्णय दि.५/५/२०११ अन्वये निश्चित केलेल्या आकृतिबंधात उक्त पदांचा समावेश आहे, या अटीच्या अधीन राहून सहकार न्यायालयातील १८५ अस्थायी पदांना दि. ०१/०१/२०१८ ते २८/०२/२०१८ पर्यत पुढे चालू ठेवण्यास शासन मान्यता देत आहे. सदर पदांची विगतवारी पुढीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	पद	पदांची संख्या
१	सहकारी न्यायाधिश	१५
२	लघुलेखक (निम्नश्रेणी)	३१
३	न्यायालयीन लिपिक	३१
४	कनिष्ठ लिपिक-टंकलेखक	३१
५	लेखा लिपिक	२३
६	शिपाई	५४
एकूण		**१८५**

वरील १८५ अस्थायी पदांचे न्यायालयनिहाय विवरणपत्र प्रबंधक, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई हे स्वतंत्रपणे प्रसृत करतील.

यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक व्ही-२ २४२५-सहकार, ००१-संचालन व प्रशासन, (०१) संचालन व प्रशासन (०१) (१०) सहकारी न्यायालयासाठी कर्मचारी वर्ग (२४२५ ०१११)" या लेखाशिर्षाखाली दाखवावा व त्याखालील सन २०१७-२०१८ च्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आ.पु.क.,दि.०८/०१/२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०११५१७३४३७२००२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Manjiri
Ganeshbhushan
Joshi

Digitally signed by Manjiri Ganeshbhushan Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=91b4708db2a52d675f7f30d81444f3844833dfc7c86d4244ee1075c97c713180, serialNumber=7d5731d128ab41d6a090557a2e9658b7382ac03af6e239ba66cc1cf9a6cf2f52, cn=Manjiri Ganeshbhushan Joshi
Date: 2018.01.15 17:39:23 +05'30'

(मं.ग.जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन),
३. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,

४. महाराष्ट्र राज्य सहकारी अपील न्यायालय, मुंबई / पुणे / नागपूर /औरंगाबाद,
५. सर्व सहकारी न्यायालये,द्वारा- प्रबंधक महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१ / २, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
९. जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड / नाशिक / जळगांव / अहमदनगर / पुणे / सातारा / सांगली / सोलापूर / कोल्हापूर / औरंगाबाद / नांदेड / अमरावती / नागपूर / अकोला / वर्धा / ठाणे / लातूर,
१०. वित्त विभाग (व्यय - २ / अर्थसंकल्प - १९),
११. कार्यासन अधिकारी, १५-स / १७-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
१२. निवड नस्ती (५-स).